# बसवंत गार्डन

## एक वैशिष्ट्यपूर्ण कृषी-उद्योग पर्यटन केंद्र

**कृषी संस्कृती आणि कृषी पर्यटन यांचे आनंदी जीवनशैलीच्या दृष्टिकोनातून महत्त्व सांगणाऱ्या बसवंत कृषी-उद्योग पर्यटन केंद्राबद्दल जाणून घेऊ या....**

मानवासह सर्वच सजीव सृष्टीच्या अस्तित्वामध्ये निर्णायक भूमिका असलेल्या मधमाशीचे अनोखे महत्त्व सांगणाऱ्या, भारतातील पहिल्या **'ॲपी टुरिझम सेंटर – बसवंत मधमाशी उद्यानाची'** स्थापना २०१९ मध्ये झाली. तसेच **'बसवंत कृषी-उद्योग पर्यटन केंद्राची'** स्थापना २०२१ मध्ये **मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक** येथे करण्यात आली.

**बसवंत मधमाशी उद्यान बसवंत ॲपी टुरिझम – सेंटरमधील विशेष आकर्षणे अशी आहेत.**

**बीनी : सेल्फी पॉईंट :** सर्वच पर्यटकांचा, विशेष करून लहान मुलांसाठी एक आकर्षणाचा भाग म्हणजे 'बीनी' आणि 'सेल्फी पॉईंट'.

**बीनिव्हर्स :** संपूर्ण पृथ्वीतलाला, सजीव सृष्टीला म्हणजे UNIVERSE ला वाचवण्याचे, संवर्धनाचे काम मधमाशी (HONEY BEE) करत आहे. हा संदेश देण्यासाठी BEENIVERSE ही मधमाशीची उंच प्रतिकृती तयार केली असून, ती पर्यटकांच्या आकर्षणाचा भाग झाली आहे.

**मधमाशीच्या जीवनक्रमाचा माहितिपट :** येथे दोन भव्य तांत्रिक टनेल्सची निर्मिती करण्यात आलेली असून या टनेल्समधून प्रवास करताना मधमाश्यांचा संपूर्ण जीवनपट आपल्यासमोर उभा राहतो.

**मधमाश्यांची वसाहत (ॲपिअरी) :** पर्यटक व विद्यार्थ्यांना तसेच मधमाशी पालन प्रशिक्षणार्थींना मधमाश्यांचे विविध प्रकार ओळखता यावेत आणि



प्रत्यक्ष त्यांना मधमाश्या हाताळता याव्यात याकरिता ही ॲपिअरी तयार करण्यात आलेली आहे. यामध्ये सातेरी, मेलीफेरा व ट्रायगोना या जातींच्या मधमाशीच्या वसाहती ठेवण्यात आलेल्या आहेत.

**मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्र :** मधमाशी पालनाकरिता आवश्यक असलेले सर्व साहित्य व सामग्री यांची मांडणी केली आहे तसेच याबाबत विस्तृत माहिती देखील देण्यात येते. हे साहित्य मधमाशी पालन व्यावसायिकांसाठी सुद्धा उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**मधमाश्यांचे गांव :** गावातील सर्व शेतकरी एकत्र येऊन कशा प्रकारे मधमाशी पालन करु शकतात हे समजण्यासाठी मधमाश्यांचे गांव ही संकल्पना मांडण्यात आलेली आहे.

**शहरी मधमाशी पालन :** मधमाशी पालनाची आवड व छंद असणाऱ्या शहरी भागातील नागरिकांना मधमाशी पालन म्हणजे काय व ते कसे करता येईल हे समजावून देण्यासाठी संबंधित प्रतिकृती तयार करण्यात आली आहे.

**मधमाश्यांवरील लघुपट :** मधमाश्यांवरील लघुपटाच्या म्हणजेच हनी बी मूव्हीच्या माध्यमातून मधमाश्यांचे कार्य आणि जीवनशैलीबद्दल माहिती मिळते.

**खुले वाचनालय :** मधमाशीच्या संदर्भातील विविध पुस्तके आणि मासिके येथे उपलब्ध आहेत. पर्यटकांना तसेच वाचनाची आवड असलेल्या व्यक्तींसाठी निसर्गाच्या सान्निध्यात वाचनाची व्यवस्था करून दिलेली आहे.

**विसावा :** ग्रामीण भागातील संस्कृती आणि मधमाशीचे कार्य वारली पेंटिंग्जद्वारे झोपडीमध्ये दर्शविले आहे. अत्यंत आकर्षक पद्धतीने तयार केलेल्या या परिसरात



ग्रामीण वातावरणाचा अनुभव घेत पर्यटकांना विश्रांती घेता येते, हाच तो विसावा. तसेच ग्रामीण पद्धतीच्या भोजनाचा आनंदही येथे मिळवता येतो.

**डोरसेटा पॉईट – आग्या मधमाशी प्रतिकृती :**

या ठिकाणी आग्या मधमाशीच्या मोहोळातून मध काढण्याची पारंपरिक अशी काहीशी हिंसक पद्धत आणि आधुनिक सृष्टिस्नेही पद्धत यातील फरक दाखवला आहे. आग्या मधमाश्या वाचविण्याचा तसेच त्यांच्या संवर्धनाचा संदेश येथे पर्यटकांना देण्यात येतो.

**बी प्लांट नर्सरी – सीड बँक :** मधमाश्यांना कोणत्या प्रकारची फुलझाडे व वनस्पती उपयुक्त असतात याबाबत माहिती ✻ क्रीडांगण– गेम झोन पर्यटकांना दिली जाते. तसेच या नर्सरीतून विविध प्रकारची रोपे उपलब्ध करून दिली जातात.

**मधु–संग्रहालय (म्युझियम) :** मधाचे विविध प्रकार, मधमाशीपासून मिळणारे विविध पदार्थ आणि मधमाशी पालनाच्या संदर्भातील सर्व साहित्य या मधु–संग्रहालयात (म्युझियममध्ये) प्रदर्शित करण्यात आले आहे. तसेच येथे मधमाशी पालनाचा आभासी (व्हर्च्यूअल) अनुभवही मिळवता येतो. त्या बरोबरच विद्यार्थ्यांना मधमाशी संवर्धनाचे महत्व कळावे व त्यांना मधमाशीविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने पेंटिंग गॅलरी तयार करण्यात आली आहे. येथे पर्यटकांना स्वतः पेंटिंग करता येते. यासाठी साहित्यही उपलब्ध करून दिले जाते.

**प्रार्थना मेडिटेशन झोन:** मेडिटेशन म्हणजे प्रार्थना ही मानसिक शांततेसाठी खूप महत्वाची आहे. पर्यटकांना मधमाशी गार्डनमध्ये मेडिटेशन करण्याचा तसेच मधमाशीला जवळून अनुभवायचा आनंद घेता येतो.

**सेवरगांव एक आदर्श गांव (मिनिएचर व्हिलेज) :**
‘‘गांव समृद्ध, तर देश समृद्ध’ ही खूप महत्त्वाची विचारधारा बसवंत गार्डनमध्ये एका मोठ्या प्रतिकृतीद्वारे मांडली आहे; कारण खेड्यापाड्यांचा विकास झाला तरच देशाचा विकास होणार आहे. यातील दुसरी विचारधारा म्हणजे ‘गांव तेव्हाच समृद्ध होईल, जेव्हा ते जलसमृद्ध असेल’. तिसरी विचारधारा म्हणजे ‘गांव तेव्हाच समृद्ध होईल, जेव्हा फळभाज्यांवर प्रक्रिया होईल’.

**इतर विविध उपक्रम आणि आकर्षणे...**

✻ फळे–भाजीपाला तसेच मधप्रक्रिया उद्योग

✻ द्राक्ष आणि बेदाणा माहितीपट

✻ बैलांची चित्रमय ओळख

✻ ग्रामसंस्कृती विभाग

✻ क्रीडांगण – गेम झोन

बसवंत गार्डनमध्ये आल्यानंतर बुद्धीला तसेच मनाला चालना मिळते; या बरोबरच गार्डनमध्ये येणाऱ्या क्रीडाप्रेमींचा आनंद द्विगुणित करण्यासाठी ‘बसवंत गेम झोनची’ उभारणी केली आहे. त्यात मिनी गोल्फ कोर्ट, नेमबाजी यांसह निवडक मैदानी तसेच मनोरंजनाचे खेळ उपलब्ध आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ज्या पारंपरिक खेळांचा आपणास विसर पडला आहे, अशा अनेक खेळांचाही आनंद येथे घेता येतो.

त्याचप्रमाणे फळांचे मॅस्कॉट तयार करून त्यांची आकर्षक मांडणी बसवंत गार्डनमध्ये करण्यात आली आहे. याबरोबरच गोंडस, गोजिरवाण्या सशांची लगबग बघताना एक वेगळाच आनंद मिळतो. यासाठी ससे पालन प्रकल्पाची उभारणी केली आहे. तसेच मधमाशी उद्यान आणि बसवंत गार्डन या दोन प्रकल्पांची पाहणी करण्यासाठी तयार केलेल्या टुक टुक व्हॅनमधून एक अनोखा प्रवास करण्याची संधी मिळते.

(सौजन्य : पूर्वा कृषीदूत मासिक)

◆

**डॉ. भास्कर गायकवाड**
https://www.baswant.com/